दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hindupraksashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

मालक समजून कर्मचाऱ्याचा खून

पुणे : पुण्यातील रांजणगाव येथे एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पाणीपुरवठा प्रकल्पाचा मालक समजून दुसऱ्याच कामगाराची हत्या करण्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी मंगळवारी पाच जणांना ताब्यात घेतले असून दोन जण फरार आहेत. हमजा उस्मन शेख हे कारेगावच्या साईनगर प्लांटमध्ये काम करत असताना त्यांच्या डोक्यात गोळी झाडण्यात आली आणि त्यांचा मृत्यू झाला.या प्रकरणी रांजणगाव पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेने पाच जणांना अटक केली आहे. दोघे फरार आहेत.

'विश्वगुरू' भारतासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे - गिरीश महाजन

नाशिक : "देशाला नरेंद्र मोदी यांच्यासारखा सक्षम नेता मिळणे हे आपले भाग्य आहे. मोदी यांनी कधीही सुट्टी घेतली नाही. त्यांच्या नेतृत्वाखाली भारत विकसित देशाच्या दिशेने वाटचाल करीत असून, आयातदार देश अशी ओळख असलेल्या भारताने आता निर्यातदार देश म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. भारताला विश्वगुरू बनविण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे," असे प्रतिपादन पालकमंत्री गिरीश महाजन यांनी केले. नाशिक दौऱ्यावर आलेल्या मंत्री महाजन यांनी बुधवारी पत्रकारांशी संवाद साधला.

छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. ०८ ऑक्टोंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १६७ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

एआय प्लस मालिकेवर विशेष ऑफर

नवी दिल्ली : एआय प्लस स्मार्टफोनने फ्लिपकार्टच्या बिग बिलियन डेज २०२६ निमित्त नोव्हा आणि पल्स मालिकेतील स्मार्टफोन विशेष किमतीत उपलब्ध करून दिले आहेत. या ऑफरमध्ये पल्स २ आणि पल्स २ एफई ₹८,९९९ पासून, नोव्हा २ ५जी ₹११,९९९, नोव्हा २ निओ ५जी ₹१२,९९९, नोव्हा २ पावर ५जी ₹१५,९९९ पासून, तर नोव्हा २ प्रो ५जी ₹१६,९९९ पासून उपलब्ध आहे. नोव्हा २ अल्ट्रा ५जीची किंमत ₹१८,९९९, तर नोव्हाफ्लिप ५जी ₹४९,९९९ आहे. काही मॉडेल्सवर बँक ऑफरही लागू आहेत. हे स्मार्टफोन बिग बिलियन डेजदरम्यान मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध असतील.

उज्जीवन बँकेचा महाराष्ट्रात विस्तार

अहिल्यानगर : उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने महाराष्ट्रातील ८ ठिकाणी ८ नवीन मायक्रो बँकिंग शाखा सुरू केल्या आहेत. या विस्तारामुळे सुमारे ८० नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. ग्राहकांना वैयक्तिक व समूह कर्जांसह विविध बँकिंग आणि वित्तीय सेवा उपलब्ध होणार आहेत. नवीन शाखांमुळे महाराष्ट्रातील बँकेची उपस्थिती आणि पोहोच अधिक मजबूत होण्यास मदत होणार असून, वित्तीय समावेशनाला चालना मिळण्यासोबतच ग्राहकांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यावर भर दिला जाणार आहे.

जिओहॉटस्टारवर 'हर लाईफ का बॅलन्स' डॉक्युसिरीजचे प्रीमियर

गुरुग्राम : टू बॅलन्स या एआय-सक्षम डिजिटल लेंडिंग प्लॅटफॉर्मने तीन भागांची डॉक्युसिरीज 'हर लाईफ का बॅलन्स' लाँच केली आहे, जी जिओहॉटस्टारवर स्ट्रीम होत आहे. ही सिरीज विविध क्षेत्रांतील टू बॅलन्सच्या सहा ग्राहकांच्या प्रवासावर आधारित आहे. या सिरीजमध्ये वेळेवर मिळालेल्या कर्जामुळे त्यांना व्यवसाय, शिक्षण आणि वैयक्तिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कशी मदत झाली, हे दर्शवण्यात आले आहे. टू बॅलन्सचे फाउंडर आणि सीईओ चार्ली ली म्हणाले, "भारताने व्यक्तींना औपचारिक आर्थिक यंत्रणेशी जोडण्यात उल्लेखनीय प्रगती केली आहे. यापुढील पाऊल म्हणजे आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध असणाऱ्यांना कर्जाची उपलब्धता सुलभ करून देणे आणि या पुढील वाटचालीत योगदान देताना आम्हाला अभिमान वाटतो.


छोटा भीम आणि लिटिल सिंघम येणार एकत्र

मुंबई : पोगो या वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीच्या फ्लॅगशिप किड्स एंटरटेनमेंट ब्रँडने भारतातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या ॲनिमे-प्रेरित क्रॉसओव्हरचे घोषणा केली – राइज ऑफ अंशक्स: हिरोज ऑफ डेस्टिनी. पहिल्यांदाच भारतातील दोन सर्वात मोठे देसी हिरो छोटा भीम आणि लिटिल सिंघम एकाच कॉस्मिक ॲनिमे विश्वात पाऊल ठेवत आहेत – चाहते ज्याची आतुरतेने वाट पाहत होते, तो हाच जबरदस्त टीम-अप! प्रकाश आणि अंधार यांच्यातील तीव्र होत चाललेली लढाई त्यांचे जग गिळंकृत करू पाहत असताना हे दोन्ही आयकॉन एकत्र येतात आणि त्यांच्यासोबत पोगोच्या सर्वात मोठ्या सुपरहिरोंच्या खांद्याला खांदा लावून उभे राहणारे नव्या नायकांचे एक संपूर्ण नवे पथकही सामील होते.

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचा विस्तार अधिक मजबूत

परभणी : उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक (उज्जिवन एसएफबी) ने आज महाराष्ट्र राज्यातील 8 ठिकाणी 8 नवीन शाखा सुरू केल्याची घोषणा केली. या सर्व शाखा मायक्रो बँकिंग शाखा आहेतया विस्तारामुळे अंदाजे 80 नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. तसेच, या माध्यमातून परिसरातील ग्राहकांना वैयक्तिक कर्ज आणि समूह कर्जांसह बँकिंग व वित्तीय उत्पादने आणि सेवांची सर्वसमावेशक सुविधा उपलब्ध होणार आहे.

"शाल जोडे"



अजिंठ्यात 'शिवशाही'चा जीवघेणा फज्जा खटारा बसचा दरवाजा लॉक पर्यटक अर्धा तास बसमध्येच कैद

दगड-हातोड्याने फोडला 'हायटेक' बसचा दरवाजा पर्यटकांच्या जीवाचे काही बरेवाईट झाल्यास जबाबदार कोण? एसटी महामंडळ की एमटीडीसी

फर्दापूर प्रतिनिधी शेख हक्कानी

फर्दापूर जगप्रसिद्ध अजिंठा लेणी पाहण्यासाठी आलेल्या पर्यटकांच्या जिवाशी खेळण्याचा भयंकर प्रकार मंगळवारी उघडकीस आला आहे पर्यटकांना लेणीत घेऊन जाणारी वातानुकूलित 'शिवशाही' बस MH 09 FL 1047 अचानक डब्बा निघाली लेणी परिसरात पोहोचल्यानंतर या बसचा दरवाजाच जाम झाल्याने आतील पर्यटक चक्क अर्धा तास गुदमरलेल्या अवस्थेत बसमध्येच कैद होते शेवटी दगड आणि टामीचे घाव घालून दरवाजा उघडण्याची नामुष्की प्रशासनावर ओढवली मात्र या घटनेमुळे प्रशासनाचा आणखी एक मोठा आणि गंभीर बेजबाबदारपणा चव्हाट्यावर आला आहे

बातमीतील संतापजनक आणि गंभीर मुद्दे

खटारा बसेसमुळे जागतिक वारसा असलेल्या चित्रांना धोका

अजिंठा लेणीतील प्राचीन पेंटिंग्ज आणि वारसा सुरक्षित राहावा म्हणून लेणी परिसरात 'प्रदूषणमुक्त' Electronic/Electric बसेस चालवण्याचा निर्णय घेण्यात आला होता तसा बोर्डही २००२ पासून लेणी परिसरात लावलेला आहे मात्र एसटी महामंडळाचे अधिकारी आणि एमटीडीसी MTDC प्रशासन याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत आहेत डिझेलवर चालणाऱ्या आणि विषारी धूर ओकणाऱ्या या खटारा



बसेस थेट लेणीच्या परिसरात नेल्या जात आहेत या विषारी प्रदूषणामुळे लेणीतील हजारो वर्षे जुन्या चित्रांचे Paintings अतोनात नुकसान होत आहे जागतिक वारसा नष्ट करण्याचे पाप प्रशासन का करत आहे

पर्यटकांच्या जीवाचे बरेवाईट झाले असते तर जबाबदार कोण

बसचा दरवाजा अर्धा तास लॉक होता आतमध्ये देश विदेशातील पर्यटक अडकले होते अशा गुदमरलेल्या अवस्थेत जर एखाद्या वयोवृद्ध पर्यटकाला हृदयविकाराचा झटका आला असता किंवा कुणाच्या जीविताची हानी झाली असती तर याला जबाबदार कोण राहिले असते एसटी महामंडळ की एमटीडीसी प्रशासन केवळ तिकीट वसुली करायची आणि पर्यटकांना वाऱ्यावर सोडायचे हाच या दोन्ही विभागांचा धंदा उरला आहे का

दगड हातोडी आणि टामीचा 'देसी जुगाड' पर्यटकांना खाली उतरवण्यासाठी चालकाने दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला पण तो उघडलाच नाही आत अडकलेले पर्यटक घाबरून गेले होते अखेर या हायटेक शिवशाहीचा दरवाजा उघडण्यासाठी चक्क दगड हातोडी आणि टामीचा लोखंडी सळई वापर करावा लागला

तातडीने कारवाईची मागणी अन्यथा आंदोलन

विदेशी पर्यटकांसमोर आपल्या देशाची आणि पर्यटन व्यवस्थेची पुरती अब्रू वेशीवर टांगली गेली आहे प्रशासनाने २००२ च्या निर्णयाची तत्काळ अंमलबजावणी करून लेणी परिसरात केवळ प्रदूषणमुक्त इलेक्ट्रॉनिक बसेस सुरू कराव्यात तसेच पर्यटकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या खटारा बसेस तत्काळ भंगारात काढाव्यात. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संतप्त पर्यटक आणि नागरिकांनी दिला आहे

सदनिका बांधल्या कर्जातून, विकल्या मनमानीतून!

12 संस्थांवर संस्था प्रशासकांची नियुक्ती; परवानगीशिवाय खरेदी-विक्री केल्यास कारवाई

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन तारण ठेवून शासनाच्या गटविमा योजनेतून मंजूर झालेल्या गृहकर्जातून उभारलेल्या सहजापूर आणि शरणापूर येथील १२ गृहनिर्माण संस्थांच्या कारभारात गंभीर गैरव्यवहार झाल्याचे समोर आले आहे. मुख्य प्रवर्तक व अध्यक्षांनी निवडणुका न घेता मनमानी पद्धतीने कारभार केल्याचे, तसेच सदनिकांची परस्पर विक्री करून खोट्या दस्तऐवजांचा वापर केल्याचे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. त्यामुळे संबंधित संस्थांवर संस्था प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या परवानगीशिवाय सदनिकांची खरेदी-विक्री करू नये, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

या संस्थांमध्ये शासकीय आणि निमशासकीय कर्मचारी सभासद होते. त्यांच्या शासकीय वेतनाला तारण ठेवून गटविमा योजनेअंतर्गत गृहकर्ज मंजूर करण्यात आले. या कर्जातून सभासदांसाठी सदनिका उभारण्यात आल्या. मात्र, संस्थेचा कारभार नियमाप्रमाणे न चालविता काही सदनिकांची मनमानी पद्धतीने विक्री करण्यात आल्याचे तपासणीत समोर आले. विशेष म्हणजे, काही सभासदांनी सेवानिवृत्तीच्या वेळी कर्जाची परतफेड केली होती. तरीही त्यांना त्यांच्या हक्काच्या सदनिका देण्यात न आल्याचा आक्षेप आहे.

त्याऐवजी संबंधित सदनिकांची खोट्या दस्तऐवजांच्या आधारे परस्पर विक्री करण्यात आली. या व्यवहारातून मिळालेली रक्कम शासकीय कर्जापोटी कोषागारात जमा करणे अपेक्षित असतानाही ती जमा न करता हडप केल्याचे आक्षेप संस्था प्रशासकांनी नोंदविले आहेत. त्यामुळे या प्रकरणातील आर्थिक व्यवहार आता कायदेशीर तपासणीच्या कक्षेत आले आहेत.

संस्थांच्या कारभारातील गैरप्रकार केवळ सदनिका विक्रीपुरते मर्यादित नसल्याचेही समोर आले आहे. संस्थांच्या निवडणुका न घेता मुख्य प्रवर्तक व अध्यक्षांनी स्वयंघोषित पद्धतीने पदे निश्चित केली. समिती सभा, विशेष सभा आणि वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आल्या नाहीत. आर्थिक व्यवहारांची हिशोबाची कीर्द लिहिण्यात आली नाही, तसेच दरवर्षी लेखापरीक्षणही करण्यात आले नसल्याचे आक्षेप आहेत. या अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम १०३ अन्वये संस्थांवर संस्था प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सहजापूर येथील राजदिप सहकारी गृहनिर्माण संस्थेतील ५४ सभासदांसाठी १ कोटी ३५ लाख ९३ हजार रुपये कर्ज मंजूर झाले होते. अनामिका छाया संस्थेतील ६४ सभासदांसाठी १ कोटी ६५ लाख ७७ हजार ९४० रुपये, तर अष्टगंध संस्थेतील ४६ सभासदांसाठी १ कोटी ४३ लाख ३६ हजार ६५० रुपये मंजूर झाले होते. मनःशांती संस्थेतील ५१ सभासदांसाठी १ कोटी १५ लाख ६३ हजार रुपये, अरुणोदय संस्थेतील ६८ सभासदांसाठी १ कोटी ५७ लाख २१ हजार ५०० रुपये आणि जान्हवी संस्थेतील ५८ सभासदांसाठी १ कोटी ६६ लाख २५० रुपये कर्ज मंजूर झाले होते. या व्यतिरिक्त प्रितीसंगम आणि ज्ञान सरिता या शरणापूर येथील, तर न्यू आनंदवन, रजनीगंधा आणि प्रभातकिरण या सहजापूर येथील तसेच प्रभातसरिता, शरणापूर येथील संस्थांचा या प्रकरणात समावेश आहे. या सहा संस्थांबाबतची सविस्तर माहिती सध्या उपलब्ध नसल्याचे संस्था प्रशासक सी. एस. बेग यांनी कळविले आहे.

या १२ संस्थांवर संस्था प्रशासकांची नियुक्ती झाल्याने आता संबंधित सदनिकांच्या खरेदी-विक्रीवर निर्बंध आले आहेत. सभासद किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने संस्था प्रशासकांची पूर्वपरवानगी न घेता सदनिकेचा व्यवहार करू नये. परस्पर खरेदी-विक्रीचा व्यवहार केल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा तालुका उपनिबंधक विलास कोळेकर आणि संस्था प्रशासक सी. एस. बेग यांनी दिला आहे. त्यामुळे या संस्थांमधील सदनिकांच्या व्यवहारांवर आता संस्था प्रशासकांची नजर राहणार असून, नियमबाह्य व्यवहार करणाऱ्यांची अडचण वाढणार आहे.

भारतीय गणितज्ञ महेश काकडे यांना 2026 चा रामानुजन पुरस्कार जाहीर



मुंबई : भारतीय गणितज्ञ आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (IISc), बंगळुरू येथील प्राध्यापक महेश काकडे यांना 2026 चा रामानुजन पुरस्कार जाहीर झाला आहे. संख्या सिद्धांतातील (Number Theory) त्यांच्या महत्त्वपूर्ण संशोधनाची दखल घेत त्यांना या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. भारतीय गणित संशोधनासाठी हा महत्त्वाचा गौरव मानला जात आहे.रामानुजन पुरस्कार हा इंटरनॅशनल सेंटर फॉर थिअरेटिकल फिजिक्स (ICTP) आणि इंटरनॅशनल मॅथेमॅटिकल युनियन (IMU) यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जातो. विकसनशील देशात कार्यरत राहून उत्कृष्ट गणितीय संशोधन करणाऱ्या 45 वर्षांखालील गणितज्ञांचा या पुरस्काराद्वारे गौरव केला जातो.

महेश काकडे यांनी अल्जेब्रिक नंबर थिअरी अर्थात बीजगणितीय संख्या सिद्धांत या गणिताच्या महत्त्वाच्या शाखेत उल्लेखनीय संशोधन केले आहे. संख्या सिद्धांतामध्ये संख्यांचे गुणधर्म, त्यांच्यातील परस्परसंबंध आणि त्यामागील गणिती नियमांचा अभ्यास केला जातो. काकडे यांच्या संशोधनामुळे संख्यांमधील गुंतागुंतीचे संबंध तसेच गणितातील विविध रचनांमधील परस्परसंबंध समजून घेण्यास महत्त्वपूर्ण मदत झाली आहे. त्यांच्या संशोधनातील एक महत्त्वाचा भाग इवासावा सिद्धांताशी संबंधित आहे. गणितीय रचना अधिकाधिक गुंतागुंतीच्या होत गेल्यानंतर त्यामध्ये निर्माण होणारे नमुने, बदल आणि परस्परसंबंध समजून घेण्यासाठी या सिद्धांताचा उपयोग केला जातो. या क्षेत्रात काकडे यांनी महत्त्वपूर्ण निष्कर्ष मांडले आहेत. महेश काकडे यांनी ग्रॉस-स्टार्क आणि ब्रुमर-स्टार्क अनुमानांवरही महत्त्वाचे संशोधन केले आहे. संख्या सिद्धांतातील हे दीर्घकाळापासून अभ्यासले जाणारे महत्त्वाचे प्रश्न आहेत.

दुष्काळातही लाडकी बहीण योजना बंद होणार नाही : एकनाथ शिंदेंची ग्वाही



मुंबई : दुष्काळातही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी परभणी येथील सभेत दिली. 'कोणीही आले तरी लाडकी बहीण योजना कधीच बंद होणार नाही', असे त्यांनी स्पष्ट केले.

विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली. अडीच लाख रुपयांपेक्षा कमी वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असलेल्या पात्र महिलांना या योजनेअंतर्गत दरमहा १ हजार ५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. योजनेसाठी विविध अटी निश्चित करण्यात आल्या असून, पात्र लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात रक्कम जमा केली जाते. योजनेचा लाभ पात्र महिलांनाच मिळावा आणि अपात्र लाभार्थींना वगळता यावे, यासाठी सरकारने ई-केवायसी प्रक्रिया सुरू केली. त्यानंतर ई-केवायसी न करणाऱ्या तसेच निकषांनुसार अपात्र ठरणाऱ्या अनेक महिलांची नावे लाभार्थी यादीतून वगळण्यात आली. काही ठिकाणी पात्रतेच्या अटींचे पालन न करताही लाभ घेतल्याचे आढळून आले होते. त्यामुळे योजनेच्या लाभार्थी संख्येत घट झाली आहे. दरम्यान, लाभार्थी महिलांची नावे वगळण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर विरोधकांकडून योजना बंद होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. योजनेच्या आर्थिक भाराबाबतही चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर शिंदे यांनी योजना बंद होणार नसल्याचे स्पष्ट केले.

गंगापूर तालुक्यात वाळू उपशावरून वादाचा भडका; एकाचा खून



गंगापूर प्रतिनिधी- तालुक्यातील सनव येथील शिवना नदीपात्रात अवैध वाळू उपशावरून दोन गटांत झालेल्या वादाचे पर्यवसान थेट हाणामारीत होऊन एका इसमाचा मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना-बुधवार ७ ऑक्टोबर रोजी पहाटे २ ते ३ वाजेच्या सुमारास घडली. या घटनेत डोक्यात अज्ञात हत्याराने वार झाल्याने रियाज पठाण (रा. सनव) यांचा मृत्यू झाला असून अशद सत्तार शेख (रा. सनव) हा गंभीर जखमी झाला आहे. या घटनेने सनव परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गंगापुर तालुक्यातील सनव येथील शिवना नदीपात्रात रात्री जेसीबीच्या साहाय्याने वाळू उपसा करून डंपरमध्ये भरण्याचे काम सुरू असताना रियाज पठाण व अशद सत्तार शेख हे नदीपात्रात आले होते. यावेळी दुसऱ्या गटातील काही जणांनी त्यांच्यावर हल्ला केल्याचे सांगण्यात येत आहे. या हल्ल्यात रियाज यांच्या डोक्यात अज्ञात हत्याराने जोरदार वार झाल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी लासुर स्टेशन येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मृत्यू झाल्याचे घोषित केले अशद शेख यालाही मारहाण झाल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. हल्लेखोरांपैकीही एक जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

दरम्यान, चार ते पाच दिवसांपूर्वी रियाज यांचे वाळू वाहतुकीचे ट्रॅक्टर पोलिसांना पकडून दिले होते. तसेच रियाज यांनी रात्री पोलिसांना समोरील गटाच्या वाहनाबाबत माहिती दिल्याच्या कारणावरून दोन्ही गटांत वाद निर्माण झाल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. या दोन्ही गटांमध्ये गेल्या काही दिवसांपासून वाद सुरू असल्याची माहिती असून, यापूर्वीही शिल्लेगाव पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल असल्याचे सांगण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी जान्हवी शेखर तसेच शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील व पोलिसांच्या पथकासह पहाटेपासून घटनास्थळी तळ ठोकून आहेत. घटनास्थळाची पाहणी करून पोलिसांनी हल्लेखोरांचा शोध सुरू केला आहे. आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी जान्हवी शेखर यांनी दिली. गंगापूर तालुक्यात ठीक ठीकाणी होत असलेले अवैध गौण खनिज उत्खनन बंद करण्यासाठी संबंधित विभाग अपयशी ठरत असल्याने अशा घटना घडत असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे.

हैदराबाद गॅझेटमधील 'कल्टिव्हेटर' मराठ्यांना ओबीसीत घ्या; पाटोदा करारानंतर पुढे काय?


विखे पाटील-जरांगे यांच्या भूमिकेवर डॉ. संजय लाखेपाटील यांचे सवाल

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : हैदराबाद संस्थानातील १९२१ आणि १९३१च्या गॅझेटिअरमध्ये 'कल्टिव्हेटर' गटात मराठा ही स्वतंत्र जात म्हणून नोंद असल्याचा दावा करत, या गटातील शेती करणाऱ्या व शेतीवर अवलंबून असलेल्या मराठा समाजाला इतर मागासवर्गीय प्रवर्गात समाविष्ट करण्यासाठी २ सप्टेंबर २०२५च्या हैदराबाद गॅझेट शासन आदेशात आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी शिवसेनेचे राज्य सचिव व सकळ मराठा समाज, मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक डॉ. संजय लाखेपाटील यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत केली.

पाटोदा करारानंतर मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर पुढील भूमिका काय, याचा मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील आणि मनोज जरांगे पाटील यांनी स्पष्ट खुलासा करावा, अशी मागणीही त्यांनी केली. हैदराबाद गॅझेटचा अभ्यास करण्यासाठी एक वर्षाची मुदत देण्यात आली होती, मात्र त्यामागील कायदेशीर बाबी समाजासमोर स्पष्ट करण्यात येत नसल्याचा आरोप त्यांनी केला.

लाखेपाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचविण्याची 'सुपारी मोहीम' सुरू असल्याचा आरोप केला. शिंदे यांच्या पुढाकाराने नेमलेल्या न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीने कुणबी नोंदी शोधण्याचे मोठे काम केले असून, मराठवाड्यात मोठ्या संख्येने कुणबी व एसईबीसी प्रमाणपत्रे मिळाल्याचा दावा त्यांनी केला.



जात पडताळणी समित्यांनी रद्द केलेल्या चार जात प्रमाणपत्रांचा संदर्भ देत लाखेपाटील म्हणाले की, संबंधित अर्जदारांनी आपली जात सिद्ध करण्यासाठी आवश्यक वैध पुरावे सादर न केल्याने समित्यांनी कायद्यानुसार निर्णय घेतले आहेत. त्यामुळे जात पडताळणीच्या प्रक्रियेला उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांना जबाबदार धरणे चुकीचे असल्याचे त्यांनी सांगितले.

या चार प्रकरणांना विभागीय महसूल आयुक्तांच्या अपिलीय समितीकडे पाठवून प्रमाणपत्रे वैध करून देण्याबाबत पाटोदा करारात काही तरतूद आहे का, याचाही खुलासा करण्याची मागणी त्यांनी केली. उच्च न्यायालयाने या प्रकरणांमध्ये विभागीय महसूल आयुक्तांच्या समितीकडे प्रकरणे सोपविण्यास कायदेशीर नकार दिल्याचा दावाही त्यांनी केला.

'कुणबी नोंदी नसलेल्या गावांतील मराठ्यांचे काय?' असा प्रश्न उपस्थित करत लाखेपाटील यांनी मराठवाड्यातील गावनिहाय कुणबी नोंदींचाही मुद्दा उपस्थित केला. त्यांच्या मते, अनेक गावांमध्ये कुणबी नोंदी उपलब्ध नसल्याने त्या गावांतील मराठा समाजाला केवळ वंशावळीद्वारे कुणबी सिद्ध करणे शक्य होणार नाही. त्यामुळे हैदराबाद गॅझेटमधील 'कल्टिव्हेटर' गटातील मराठा समाजाच्या स्वतंत्र दाव्याचा विचार करणे आवश्यक आहे.

पाटोदा करारानंतर केवळ कुणबी प्रमाणपत्रांच्या मागणीपुरता मराठा आरक्षणाचा प्रश्न मर्यादित न ठेवता, १९२१-१९३१च्या हैदराबाद गॅझेटिअरमधील नोंदींच्या आधारे 'कल्टिव्हेटर' गटातील मराठा समाजाला इतर मागासवर्गीय प्रवर्गात मान्यता देण्यासाठी शासन आदेशात दुरुस्ती करावी, हीच आता प्रमुख मागणी असावी, असे लाखेपाटील यांनी स्पष्ट केले.

विखे पाटील आणि जरांगे यांना सवाल

घनसावंगी विधानसभा निवडणुकीतील राजकीय भूमिका, खासदार संजय ऊर्फ बंडू जाधव यांच्या निवडणुकीतील भूमिका तसेच गेवराईचे माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या राजकीय पुनर्वसनाबाबत मनोज जरांगे पाटील यांनी यापूर्वी उपस्थित केलेल्या प्रश्नांना अद्याप स्पष्ट उत्तरे दिली नसल्याचा आरोप लाखेपाटील यांनी केला. तसेच पाटोदा करारातील शासन आदेश आणि हैदराबाद गॅझेटबाबतची संपूर्ण अधिकृत कागदपत्रे समाजासमोर उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी त्यांनी केली.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

केंद्राचे पथक, दुष्काळाची पाहणी आणि मदतीची आस

महाराष्ट्रातील ३२ जिल्ह्यांमधील सुमारे ८० टक्के तालुक्यांना कवेत घेणाऱ्या भीषण दुष्काळाची आणि पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्राचे ११ सदस्यांचे आंतरमंत्रालयीन पथक ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान राज्य दौऱ्यावर येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन राज्यातील दुष्काळाचे वास्तव मांडल्यानंतर आणि विशेष मदतीची मागणी केल्यानंतर तातडीने केंद्राचे पथक पाठवण्याचा निर्णय होणे, हा अत्यंत महत्त्वाचा आणि दिलासादायक टप्पा मानला पाहिजे. मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील या पथकात कृषी, जलसंपदा, अर्थ, नीती आयोग यांसह विविध महत्त्वाच्या विभागांतील अधिकाऱ्यांचा समावेश असणे, या पाहणी दौऱ्याचे गांभीर्य स्पष्ट करते. राज्यातील दुष्काळाची भीषणता केवळ कागदी आकडेवारीपुरती मर्यादित उरलेली नाही. ऐन मान्सूनच्या काळात आणि परतीच्या प्रवासातही अनेक भागांत पडलेला पावसाचा खंड, सुकलेली पिके, पिण्याच्या पाण्याचे गडद होणारे संकट आणि येत्या काळात निर्माण होणारी चाऱ्याची भीषण टंचाई यांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णपणे होरपळून निघाली आहे. अशा स्थितीत पश्चिम महाराष्ट्र (अहिल्यानगर, सोलापूर, पुणे), मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड) आणि विदर्भ (नागपूर, यवतमाळ) या तीन स्वतंत्र भागांत पथकाचे गट पाडून होणारी पाहणी ही बाधितांच्या जखमेवर फुंकर घालणारी ठरावी. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी एसी गाड्यांमधून न फिरता प्रत्यक्ष बांधावर उतरून, शेतकऱ्यांशी संवाद साधून वास्तविक नुकसान पदरात पाडून घेणे हे या दौऱ्याचे मुख्य सूत्र असायला हवे. केंद्रीय पथकाच्या या दौऱ्यामुळे केवळ परिस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन होऊन चालणार नाही, तर त्या आधारे राज्याला केंद्राकडून तातडीने मोठा निधी मिळणे आवश्यक आहे. राज्य सरकारने पाठवलेल्या प्रस्तावावर केंद्र सरकारने लालफितीचा कारभार बाजूला ठेवून विशेष आर्थिक पॅकेज मंजूर केले पाहिजे. दुष्काळी सवलती कागदावर न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीत आणणे, रोहयोची कामे सुरू करणे, छावण्या आणि पाण्याचे टँकर पुरवणे यांसाठी हा निधी कळीचा ठरणार आहे. राजकारण आणि पक्षाच्या सीमा ओलांडून केंद्र आणि राज्य यंत्रणांनी दाखवलेला हा समन्वय केवळ पाहणीपुरता मर्यादित न राहता, बळीराजाला थेट आणि जलद आर्थिक मदत मिळवून देणारा ठरेल, हीच अपेक्षा आहे.

कृषि क्षेत्रात नाविन्यता, गुणवत्ता आणि ब्रँडनिर्मितीवर भर द्या : आशाताई भिसे

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीच्या मुख्यालयातील सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने 'कृषि आणि संलग्न क्षेत्रातील उद्योगांच्या संधी' या विषयावर प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस श्रीमती आशाताई भिसे यांचे दिनांक ६ ऑक्टोबर २०२६ रोजी मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. हा कार्यक्रम कृषि महाविद्यालयाच्या सभागृहात संपन्न झाला. या मार्गदर्शनाचा ६०० हून अधिक विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तथा उद्घाटक म्हणून विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि हे ऑनलाईन होते. प्रमुख अतिथी म्हणून शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर अधिष्ठाता डॉ. राजेश क्षीरसागर, डॉ. विश्वनाथ खंदारे, अधिष्ठाता तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राजेश कदम, सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. नीता गायकवाड, प्रभारी अधिष्ठाता डॉ. रघुनाथ जायभाये, विभागप्रमुख डॉ. हिराकांत काळपांडे, पुरुषोत्तम नेहरकर आणि डॉ. सचिन मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस यांच्या प्रत्यक्ष अनुभवाधारित मार्गदर्शनाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यापीठातील विद्यार्थ्यांना उद्योग उभारणीसाठी अशा मार्गदर्शनाचा मोठा लाभ होतो. युवा उद्योजक श्रीमती आशाताई भिसे यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी आशादायी व दिशादर्शक ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी श्रीमती आशाताई भिसे यांचा परिचय करून देताना त्या अभ्यासू लोकप्रतिनिधी, उत्कृष्ट वक्त्या तसेच यशस्वी उद्योजक म्हणून परिचित असल्याचे सांगितले. त्यांच्या अनुभवातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळणे ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यापीठाला 'अ' दर्जाची मान्यता असून महाराष्ट्रात प्रथम आणि देशात ३४व्या क्रमांकाचे स्थान मिळाले आहे. विविध पुरस्कारांनी सन्मानित अशा विद्यापीठात देशाच्या विविध भागांतून विद्यार्थी शिक्षणासाठी प्रवेश घेत आहेत, ही अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांनी विद्यापीठातून शिक्षण पूर्ण करून शेतकरी कल्याणाला केंद्रस्थानी ठेवत उद्योजक म्हणून समाजात योगदान द्यावे. आधुनिक तंत्रज्ञानासह कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करून शेतकरीकेंद्रित कार्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

'नाव कमवा, पैसा आपोआप येतो' – आशाताई भिसे : मार्गदर्शन करताना श्रीमती आशाताई भिसे म्हणाल्या की, दीक्षारंभ ते दीक्षांत हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्वाचा प्रवास आहे. आज आपण या प्रवासाचा आरंभ करण्यासाठी एकत्र आलो आहोत. हे विद्यापीठ मला माझे स्वतःचे विद्यापीठ वाटते. याच विद्यापीठाने मला आदर्श शेतकरी म्हणून सन्मानित केले असून, अनेक महिलांना पुरस्कार देण्यासाठीही मला या विद्यापीठात येण्याची संधी मिळाली.

भारत हा कृषिप्रधान देश असून विद्यार्थ्यांनी कृषि शिक्षणाची निवड केली आहे. प्रत्येकाच्या मनात काही ना काही स्वप्ने असतात; मात्र आता कृषि शिक्षणाच्या माध्यमातून आपल्याला काहीतरी वेगळे आणि भरीव करून दाखवायचे आहे, अशी महत्त्वाकांक्षा विद्यार्थ्यांनी मनात बाळगावी, असे आवाहन त्यांनी केले. यशस्वी व्यक्तींचा इतिहास वाचावा, त्यांच्याकडून प्रेरणा घ्यावी आणि स्वतःच्या ध्येयासाठी निर्धाराने काम करावे, असा सल्लाही त्यांनी दिला.

आपल्या प्रवासाविषयी सांगताना त्या म्हणाल्या की, मी इलेक्ट्रॉनिक्स विषयाची पदवीधर असून बँकेत नोकरी केली. मात्र नोकरीचा राजीनामा देऊन शेती व शेतकऱ्यांसाठी काम करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाचा मला कधीही पश्चात्ताप झाला नाही. शेतकऱ्यांसाठी चांगले काम करण्याची आणि शेतकरी समूहाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळते, याचा मला आनंद आहे.

मराठवाड्याला सातत्याने दुष्काळाचा सामना करावा लागत असला तरी त्यावर मात करण्याची ताकद येथील शेतकऱ्यांमध्ये आहे, असे त्यांनी सांगितले. उद्योग व शेतीच्या क्षेत्रात काम करताना अनेक अडचणी येतात. विशेषतः महिलांना सामाजिक बंधने व मर्यादांना सामोरे जावे लागते; मात्र निर्धार, सातत्य आणि आत्मविश्वासाच्या बळावर या अडचणींवर मात करता येते, असे त्यांनी स्पष्ट केले.

गांडूळ खत निर्मितीच्या आपल्या अनुभवाविषयी बोलताना त्यांनी कमी खर्चातील तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे महत्त्व सांगितले. गांडूळ खत निर्मितीसाठी बांबूचा वापर करून उत्पादन खर्च कमी केला. या उपक्रमाची विद्यापीठाच्या तत्कालीन कुलगुरूंनी भेट देऊन पाहणी केली होती, असे त्यांनी नमूद केले. कोणताही उद्योग उभारताना उत्पादन खर्च कमी करण्यावर भर देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

व्यवसाय केवळ हौस किंवा मौज म्हणून करू नका. कामाची लाज बाळगू नका. कोणताही उद्योग करा; मात्र त्यातून नाव कमवा. उत्पादनाचा दर्जा कायम राखून स्वतःचा ब्रँड निर्माण करा, असा मौलिक सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. उद्योगात सातत्य, नाविन्यता आणि उपक्रमशीलता जोपासणे आवश्यक असून, त्यांनी दुग्ध व्यवसायातील आपल्या अनुभवातून हे स्पष्ट केले.

कृषि व संलग्न व्यवसायांच्या संधींबाबत मार्गदर्शन करताना त्यांनी मूल्यवर्धन व प्रक्रिया उद्योग उभारण्यावर भर दिला. जे विकते तेच बनवा आणि जे बनवता ते विकण्यासाठी योग्य बाजारपेठ निर्माण करा, असे सांगत विक्री व्यवस्थापनाकडे विशेष लक्ष देण्याचा सल्ला त्यांनी दिला. आकर्षक पॅकेजिंगसह दर्जेदार उत्पादन बाजारपेठेत आणावे, संवादकौशल्य आणि ग्राहकांना पटवून देण्याची क्षमता विकसित करावी, असेही त्यांनी सांगितले. उद्योग उभारताना आर्थिक शिस्त व संतुलन महत्त्वाचे असून अनावश्यक कर्जाच्या बोजाखाली अडकू नये, असा सल्लाही त्यांनी दिला. यावेळी त्यांनी सध्या उभारलेल्या दहा एकर ड्रॅगन फ्रूट शेतीची यशोगाथा विद्यार्थ्यांसमोर मांडली. विद्यार्थ्यांनी कृषि व संलग्न क्षेत्रातील विविध संधींचा अभ्यास करून यशस्वी उद्योजक बनावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

प्रास्ताविकात अधिष्ठाता डॉ. नीता गायकवाड यांनी श्रीमती आशाताई भिसे यांच्या कार्याचा परिचय करून दिला. त्या उच्चशिक्षित असून इलेक्ट्रॉनिक्स विषयाच्या पदवीधर आहेत. त्यांनी बँकेत नोकरीही केली; मात्र नोकरीचा राजीनामा देऊन गांडूळ खत निर्मितीपासून कृषि उद्योगाची सुरुवात केली आणि आज विविध कृषि व संलग्न उद्योग यशस्वीपणे उभारले आहेत, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना उद्योग उभारणीचे प्रत्यक्ष ज्ञान, अनुभव आणि प्रेरणा मिळावी, या उद्देशाने माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि आणि शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे आभार शिक्षण प्रभारी डॉ. शंकर पुरी यांनी मानले केले, तर सूत्रसंचालन श्री. कैलास जोंधळे यांनी केले. मुख्यालयातील सर्व महाविद्यालयांतील ६०० हून अधिक विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

"मी कोणत्याही महत्त्वाकांक्षेसाठी नाही, तर ध्येयासाठी जगतो"

सरकारप्रमुख म्हणून 25 वर्षे पूर्ण झाल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी भावूक!

नवी दिल्ली : आपल्या आयुष्यात कधीही निवडणूक लढवण्याचा विचार केला नव्हता, कारण लहानपणापासून मिळालेले संस्कार आणि शिक्षण यांनी आपल्याला 'महत्त्वाकांक्षेसाठी नाही, तर ध्येयासाठी जगणारी व्यक्ती' बनवले आहे, असे भावूक उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी (Prime Minister Narendra Modi) यांनी काढले. सरकारप्रमुख म्हणून २५ वर्षांचा प्रदीर्घ कार्यकाळ पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित 'विकसित भारत संकल्प सभे'त ते बोलत होते. आपल्यासाठी कार्य करणे ही केवळ जबाबदारी नसून देशसेवा आणि राष्ट्रभक्तीचे प्रतीक आहे, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

कार्यक्रमाला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, "आजचा दिवस हा केवळ जुन्या आठवणींना उजाळा देण्याचा नाही, तर आपल्या संकल्पांमध्ये नवी ऊर्जा भरण्याचा दिवस आहे. भारताला नव्या उंचीवर नेण्यासाठी जनतेचा उत्साह आणि 'सबका प्रयास' अत्यंत गरजेचे आहेत." यावेळी त्यांनी उपस्थितांकडून "आम्ही हे करून दाखवू!" या संकल्पाचा पुनरुच्चार करून



घेतला. २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवणे, जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होणे, आत्मनिर्भर भारत घडवणे, जागतिक मॅन्युफॅक्चरिंग हब बनणे, ऑलिंपिकचे आयोजन करणे आणि अंतराळ क्षेत्रात नवी झेप घेणे, हे सर्व संकल्प देश नक्कीच पूर्ण करेल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आपल्या २५ वर्षांच्या प्रशासकीय प्रवासावर बोलताना पंतप्रधान म्हणाले की, "अनेक लोक या २५ वर्षांच्या अखंड सेवेला माझे मोठे यश मानतात. पण मी याकडे वैयक्तिक मोठेपण म्हणून पाहत नाही. २५ वर्षांपूर्वी, वयाच्या पन्नासाव्या वर्षी मी आदिवासी भागात आणि पर्वतीय प्रदेशात समाजकार्य करत होतो आणि भारतीय जनता पक्षात एक संघटक म्हणून कार्यरत होतो. निवडणूक लढवण्याचा माझा कोणताही विचार नव्हता आणि तसा स्वभावही नव्हता."

राजकारणात येण्यामागे कोणताही वैयक्तिक स्वार्थ नव्हता असे सांगत त्यांनी भगवद्गीतेतील 'कर्मण्येवाधिकारस्ते' या श्लोकाचा संदर्भ दिला. "मला मिळालेली प्रत्येक जबाबदारी मी पूर्ण निष्ठेने पार पाडली आहे. देशासाठी निष्काम कर्म करणे हेच माझ्या आयुष्याचे अंतिम ध्येय आहे. देशवासीयांनी माझ्यावर ठेवलेला विश्वास आणि मिळालेल्या संधींमुळेच मी आज अखंड सेवा करू शकत आहे," असे पंतप्रधान म्हणाले.

गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून झालेला प्रवास आठवत पंतप्रधान मोदी म्हणाले की, "जेव्हा मी गुजरातची सूत्रे हातात घेतली, तेव्हा माझ्याकडे सरकार चालवण्याचा किंवा प्रशासनाचा कोणताही अनुभव नव्हता. पण माझ्याकडे जनतेवर असलेला विश्वास आणि सामाजिक कार्यकर्ता म्हणून मिळालेला अनुभव हीच माझी खरी ताकद होती. 'गुजरातचा विकास हाच देशाचा विकास' या मंत्रावर चालत आम्ही अनेक आव्हानांवर मात केली." हे २५ वर्षे माझे वैयक्तिक यश नसून या काळात देश किती पुढे गेला, यावरून याचे मूल्यमापन झाले पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी 37 लाखांहून अधिक अर्ज राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद

मुंबई : शेतीतील महिलांच्या योगदानाला ओळख देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या महिला शेतकरी प्रमाणपत्र नोंदणीला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत असून, ७ ऑक्टोबरपर्यंत तब्बल ३७ लाख ९३ हजार ५१ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ८९५ ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसभा घेण्यात आली असून, ६८ हजार ४३६ महिलांना महिला शेतकरी प्रमाणपत्र वितरित करण्यात आले आहे. राज्यातील प्रत्येक पात्र महिला शेतकरी या उपक्रमाशी जोडली जावी, यासाठी कृषी विभागाकडून नोंदणीला गती देण्यात येत असल्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६'नुसार महिलांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख, समान अधिकार आणि शासनाच्या कृषी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी महिला शेतकरी प्रमाणपत्राची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. या प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

प्राप्त अर्जांमध्ये यवतमाळ जिल्हा आघाडीवर असून तेथून २ लाख ५३ हजार ४३९ अर्ज आले आहेत. त्यापाठोपाठ सातारा २ लाख १४ हजार ७८७, नाशिक २ लाख १० हजार ३२७, अमरावती २ लाख ५ हजार ७४, तर पुणे जिल्ह्यातून १ लाख ७३ हजार ४९ अर्ज प्राप्त झाले आहेत. बुलढाणा, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, नंदुरबार, जळगाव, नांदेड, धाराशिव, धुळे, बीड आणि जालना या जिल्ह्यांतूनही प्रत्येकी एक लाखांहून अधिक महिलांनी नोंदणी केली आहे. तालुकानिहाय नोंदणीत सातारा जिल्ह्यातील कराड तालुका आघाडीवर असून तेथे ३५ हजार ४२२ नोंदणी झाली आहे. ग्रामसभा झाल्यानंतर पुढील १५ दिवसांत पात्र महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्र वितरित केले जाते. विदर्भ आणि मराठवाड्यासह राज्याच्या विविध भागांतून नोंदणी होत असून, जिल्हा आणि तालुकानिहाय नोंदणीचे कृषी विभागाकडून सातत्याने संनियंत्रण केले जात आहे.

ज्या भागांत नोंदणी कमी आहे, तेथे जनजागृती करून नोंदणी वाढविण्यावर भर दिला जात असल्याचे कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी सांगितले.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत १७ सप्टेंबर रोजी महिला शेतकरी प्रमाणपत्राच्या ऑनलाइन पोर्टलचा शुभारंभ करण्यात आला. या अभियानात विविध विभागांच्या तुलनेत कृषी विभागात सर्वाधिक नोंदणी झाल्याचा दावा कृषी विभागाने केला आहे. महिला शेतकऱ्यांचा या उपक्रमातील सहभाग वाढत असून, उर्वरित पात्र महिलांनी लवकरात लवकर ऑनलाइन नोंदणी करावी, असे आवाहन भरणे यांनी केले आहे.

'एमपीएससी'चे आंदोलन आता राजकीय झाले : देवेंद्र फडणवीस

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांबाबत विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला आता राजकीय स्वरूप आले असून, मूळ मागण्यांपेक्षा विविध राजकीय विषयांवर भाषणे केली जात आहेत, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या आडून राजकारण केले जात असून, एमपीएससीच्या प्रश्नांवर सरकारने विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा करून त्यांच्या मागण्यांवर निर्णय घेतल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

नवी दिल्ली येथे माध्यमांशी संवाद साधताना फडणवीस यांनी एमपीएससीच्या आंदोलनाबाबत सरकारची भूमिका स्पष्ट केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी या विषयावर कोणतीही चर्चा झालेली नसल्याचे त्यांनी सांगितले. आंदोलनाच्या ठिकाणी एमपीएससीच्या विषयांऐवजी पंतप्रधान नरेंद्र मोदी, देशातील राजकीय परिस्थिती आदी विषयांवर भाषणे होत असल्याचा दावा त्यांनी केला. मात्र, आंदोलनात काही विद्यार्थीही सहभागी असल्याने पोलिसांनी संयमाने परिस्थिती हाताळल्याचे फडणवीस यांनी नमूद केले.

एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे १५ जणांचे शिष्टमंडळ सरकारकडे आले होते. या शिष्टमंडळाने पाच मागण्या केल्या होत्या. त्यातील एमपीएससीच्या अध्यक्षांना पदावरून हटवून त्यांची न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी होती. एमपीएससीच्या अध्यक्षांना हटविण्याचा अधिकार राज्य सरकारकडे नसून, घटनात्मक प्रक्रियेनुसार त्याबाबत राष्ट्रपतींकडे अधिकार



असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. मात्र, न्यायालयीन चौकशी करण्यास सरकारने तयारी दर्शविली आणि उर्वरित चार मागण्याही मान्य केल्याचे फडणवीस म्हणाले.

ज्या पेपरफुटीच्या प्रकरणावरून अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे, त्या वेळी विद्यमान अध्यक्ष पदावर नव्हते. तरीही विद्यार्थ्यांच्या भावनेचा विचार करून त्यांच्या कामकाजाची निष्पक्ष चौकशी करण्यास सरकारने मान्यता दिली. चौकशीत त्यांचा या प्रकरणाशी संबंध किंवा गैरवर्तन आढळल्यास संविधानाच्या कलम ३१७ अंतर्गत त्यांना पदावरून दूर करण्याची शिफारस करण्याची सरकारची तयारी असल्याचे त्यांनी सांगितले.

एमपीएससीच्या कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीने एमपीएससीशी संबंधित विविध भागधारकांशी संवाद साधला. विद्यार्थी, प्राध्यापक आणि एमपीएससीचे माजी विद्यार्थी यांनी समितीसमोर आपले प्रश्न मांडले असून, त्यांच्या सूचनांच्या आधारे समिती शिफारशी करणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. पेपरफुटीच्या प्रकरणात संबंधितांना अटक करण्यात आली असून, पूर्वीच्या परीक्षांबाबतही संशय असल्यास त्याची चौकशी करण्यास सरकारने मान्यता दिली आहे.

फलाहारी महाराजांच्या खळबळजनक दाव्यावर विराट कोहलीची पहिली प्रतिक्रिया!

मुंबई : प्रेमानंद महाराजांना प्रसिद्धी मिळवून देण्यासाठी भारतीय क्रिकेटपटू विराट कोहलीला तब्बल ५ कोटी रुपये देऊन आश्रमात आणण्यात आले होते. राजस्थानमधील एका कंपनीने अथवा बिल्डर लॉबीने हा सर्व खर्च केला होता, असा दावा त्यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना लिहिलेल्या पत्रात केला. फलाहारी महाराजांच्या या खळबळजनक दाव्यानंतर आता विराट कोहलीच्या बाजूने अधिकृत स्पष्टीकरण समोर आले आहे. विराट कोहलीच्या प्रवक्त्यांनी एक विशेष निवेदन जारी करत हे सर्व आरोप पूर्णपणे फेटाळून लावले आहेत. "फलाहारी महाराज यांनी केलेले सर्व दावे पूर्णपणे असत्य, निराधार आणि काल्पनिक आहेत. विराट कोहली हे केवळ आणि केवळ प्रेमानंद महाराजांबद्दल असलेल्या अथांग श्रद्धेपोटी व आदरापोटी त्यांची भेट घेण्यासाठी आश्रमात जातात," असे स्पष्टीकरण निवेदनात देण्यात आले आहे.

सायबर फसवणुकीमध्ये सावधगिरी हाच मोठा बचाव: सायबर सेलचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले

अहिल्यानगर : इतर गुन्ह्यांपेक्षा सायबर गुन्हे संपूर्णपणे वेगळे आहेत. सायबर फसवणुकीमध्ये सावधगिरी बाळगणे हाच मोठा बचाव असल्याचे प्रतिपादन अहिल्यानगर जिल्हा पोलीस दल सायबर क्राईम ब्रँच पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात संपूर्ण ऑक्टोबर महिन्यात सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने रेल्वे स्टेशन भागातील संजीवनी कॉलनीत जेष्ठ नागरिकांसाठी आयोजित सायबर सुरक्षितता जनजागृती कार्यक्रमात श्री ढिकले यांनी जेष्ठ नागरिकांना मार्गदर्शन केले.

श्री ढिकले पुढे म्हणाले की, जगात कोणतीही गोष्ट फुकट आणि स्वस्त मिळत नाही. त्यामुळे सोशल मीडियावरील जाहिरातींच्या प्रलोभनांना नागरिकांनी बळी पडू नये. सायबर फसवणुकीमध्ये प्रामुख्याने डिजिटल अरेस्ट, डिजिटल मार्केटिंगचे अमिष, मोठ्या परताव्याच्या आमिषाने शेअर मार्केटिंगमध्ये गुंतवणुक हे तीन प्रकार निदर्शनास येतात. यामध्ये फसवणूक झालेल्या



नागरिकांपैकी 60% लोक हे ज्येष्ठ नागरिक आहेत.

त्यामुळे सायबर फसवणुकीपासून बचावासाठी ज्येष्ठ नागरिकांनी विशेष सतर्क रहावे असे आवाहन श्री ढिकले यांनी यावेळी केले.

सायबर गुन्हेगारांकडे विविध मार्गांनी डेटा जमा झालेला असतो. ज्येष्ठ नागरिकांना सहज विश्वासात घेऊन फसवणूक करणे सोपे असते ही बाब सायबर गुन्हेगारांना लक्षात आलेली आहे.

ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक करताना सायबर गुन्हेगारांकडून वेगवेगळ्या संकल्पना वापरण्यात येतात. गंभीर गुन्ह्यात सहभाग आढळला आहे अशी भीती घालून डिजिटल अरेस्टचा बनाव केला जातो. त्या माध्यमातून तातडीची स्थिती निर्माण केली जाते. कारवाईची भीती घातली जाते. आणि शेवटी संबंधितांकडून मोठ्या रकमा उकळल्या जातात. याचबरोबर मोठ्या परताव्याच्या अमिषाने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक तसेच डिजिटल मार्केटिंगच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात नफ्याची लालूच दाखवली जाते व त्या माध्यमातून देखील जेष्ठ नागरिकांची आर्थिक फसवणूक होत आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांनी सोशल मीडिया हाताळताना अतिशय सतर्क रहावे.

सायबर गुन्हेगारांकडून फसवणूक झाल्यास तात्काळ 1930 या क्रमांकावर संपर्क साधून तात्काळ आपली तक्रार नोंदवावी तसेच आपल्या जवळच्या नातेवाईकांना सत्य घटना सांगून तातडीने उपाययोजना करावी असे आवाहन श्री ढिकले यांनी यावेळी उपस्थितांना केले.

डिजिटल अरेस्ट असा कोणताही प्रकार अस्तित्वात नाही. ही फसवणुकीची पूर्णपणे काल्पनिक संकल्पना आहे. अशा प्रकारांना नागरिकांनी अजिबात घाबरू नये व बळी पडू नये. याचबरोबर आपले पर्सनल डिटेल्स, ओटीपी, संशयास्पद अनोळखी लिंक्स, एपीके फाइल्स इत्यादींबाबत सतर्कता बाळगावी. याचबरोबर सोशल मीडियावरील जाहिरातींच्या प्रलोभनांना बळी पडू नये अशा महत्त्वपूर्ण सूचना श्री ढिकले यांनी यावेळी उपस्थित जेष्ठ नागरिकांना केल्या.

यावेळी रेल्वे स्टेशन परिसर ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष के.डी. खानदेशे, सचिव अशोक आगरकर, श्रीकृष्ण लांडगे, जनजागृती कार्यक्रमाचे संयोजक अभय ललवाणी यांच्यासह मोठ्या संख्येने जेष्ठ नागरिक उपस्थित होते. या जनजागृती कार्यक्रमाच्या आयोजनासाठी ऋषिकेश ललवाणी, सुयश चांडक, अश्विन डोंगरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

सेवा संकल्प अभियानांतर्गत जिंतूर, सेलू येथे रक्तदान शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद



हिंदू प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: जिल्ह्यात जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण आणि मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. 17 सप्टेंबर ते 17 ऑक्टोबर 2026 या कालावधीत सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहेत. या अभियानांतर्गत आज जिंतूर व सेलू पंचायत समिती स्तरावर विशेष रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला अधिकारी, कर्मचारी तसेच स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद रक्तदान केले.

सेलू येथील गट शिक्षण अधिकारी कार्यालयात स्वच्छ भारत मिशन ग्रामीण व पंचायत समिती सेलू यांच्या वतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले. यावेळी गट विकास अधिकारी यांच्यासह ग्रामपंचायत अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी तसेच स्वयंसेवकांनी रक्तदान केले. रक्तदान करणाऱ्या दात्यांचा उत्साह वाढविण्यासाठी शिबिरानंतर प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तालुका आरोग्य अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांच्या हस्ते रक्तदात्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. तसेच, सेवा संकल्प अभियानांतर्गत पंचायत समिती जिंतूर येथेही रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी सहभागी होत रक्तदान केले. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासत रक्तदानासारख्या उपक्रमांना प्रोत्साहन मिळत असून, 'रक्तदान हेच जीवनदान' या संदेशातून समाजात रक्तदानाबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

राज्यसभा खा. डॉक्टर अजित गोपछडे यांनी पोखरणी नृसिंह येथे देवदर्शनघेतले



हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**श्री क्षेत्र नरसिंह पोखर्णी देवस्थान येथे राज्यसभा खासदार डॉ. अभिजीत गोमछडे यांचा श्री क्षेत्र नरसिंह पोखर्णी देवस्थानचे अध्यक्ष मंचकराव वा वघ यांच्यावतीने श्रीनरसिंहाची प्रतिमा आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला त्यावेळेस भाजपचे नेते संतोष मुरकुटे ,भाजपा जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे आदींची उपस्थिती होती

पदवीधर निवडणुकीत 54 उमेदवार रिंगणात

छाननीअंती सर्व नामनिर्देशनपत्रे वैध

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर - औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी दाखल झालेल्या नामनिर्देशनपत्रांची मंगळवारी (दि. ७) छाननी प्रक्रिया पार पडली. छाननीअंती एकूण ५४ उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे वैध ठरली आहेत. त्यामुळे आता उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडणुकीतील अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे.

निवडणूक कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या वैध उमेदवारांच्या यादीत अनुक्रमांक १ ते ५४ पर्यंतच्या उमेदवारांचा समावेश आहे. यामध्ये विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांसह अपक्ष उमेदवारांनीही आपली दावेदारी कायम ठेवली आहे. आता उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी ९ ऑक्टोबरपर्यंत मुदत असून, त्यानंतर निवडणुकीच्या रिंगणातील अंतिम उमेदवारांची संख्या स्पष्ट होईल.

या निवडणुकीसाठी २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदान होणार आहे. त्यानंतर २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार असून, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे. माघारीच्या अंतिम मुदतीनंतर कोणकोणते उमेदवार मैदानात राहतात, याकडे आता पदवीधर मतदारसंघातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

लेखणीला लाठ्यांचे उत्तर; बाबरा येथे पत्रकारावर हल्ला

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजी नगर : पत्रकाराने प्रसिद्ध केलेल्या बातम्यांचा राग मनात धरून काही इसमांनी पत्रकार राधेश्याम हिवाळे यांच्यावर लाठ्या-काठ्यांनी हल्ला केल्याची गंभीर घटना बाबरा येथे घडली. या घटनेत हिवाळे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तसेच सोबत असलेल्या पत्नीला ही धक्काबुक्की करण्यात आली असून हल्ल्याच्या घटनेचा पत्रकारिता क्षेत्रातून तीव्र निषेध व्यक्त होत आहे.

हिवाळे हे घराकडे जात असताना काही इसमांनी त्यांना अडविले. संबंधित इसम हे एका कथित बोगस डॉक्टरचे हितचिंतक व डॉक्टर असल्याचे सांगण्यात येते. "आमच्या बातम्या का छापतो?" असा जाब विचारत त्यांनी हिवाळे यांच्या पत्नीसोबत गैरवर्तन व धक्काबुक्की केल्याचा आरोप आहे. पत्नीला अश्लील धमकी दिल्याचेही सांगण्यात येते.

या प्रकाराला हिवाळे यांनी विरोध केला असता त्यांच्यावर लाठ्या-काठ्या तसेच काही अज्ञात धारदार वस्तूंनी हल्ला करण्यात आल्याचे सांगण्यात येते. हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. दरम्यान, रस्त्याने जाणाऱ्या काही पादचारी नागरिकांनी मध्यस्थी करून हिवाळे यांची हल्लेखोरांच्या तावडीतून सुटका केली. त्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

बातमी प्रसिद्ध केल्याच्या कारणावरून पत्रकाराला मारहाण होणे ही गंभीर बाब असून, लेखणीला लाठ्यांचे उत्तर देण्याचा हा प्रकार पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर घाला असल्याची भावना व्यक्त होत आहे. घटनेतील संबंधितांवर कठोर कारवाई करावी, तसेच पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांना संरक्षण द्यावे, अशी

युवक महोत्सवात विद्यापीठाची सलग तिसऱ्यांदा विजयी हॅटट्रिक

सर्वसाधारण विजेतेपदासह नाट्य व ललित कला विभागातील उत्कृष्ट संघाचे चषक

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कलावंतांनी केंद्रीय युवा महोत्सवात सलग तिसऱ्यांदा सर्वसाधारण विजेतेपद पटकावत विजयी हॅटट्रिक साधली. २०२४, २०२५ आणि २०२६ अशी सलग तीन वर्षे विद्यापीठाच्या संघाने चॅम्पियनशिपवर नाव कोरले. यंदाही ललित कला, नाट्य आणि संगीत विभागात उल्लेखनीय कामगिरी करत विद्यापीठाने विविध पारितोषिकांसह चार चषकांवर कब्जा केला.

केंद्रीय युवा महोत्सवाचा पारितोषिक वितरण समारंभ बुधवारी (दि. ७) विद्यापीठाच्या नाट्यगृहात झाला. कुलगुरू डॉ. विजय फुलारी अध्यक्षस्थानी होते. अभिनेत्री नम्रता संभेराव आणि पार्श्वगायक रवींद्र खोमणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रकुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते, व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. दत्तात्रय भांगे, डॉ. अपर्णा पाटील, कुलसचिव डॉ. संजय कवडे, संचालक डॉ. कैलास अंभुरे यांची उपस्थिती होती.

युवा महोत्सवात चार रंगमंचांवर २८ कलाप्रकार सादर करण्यात आले. त्यात विद्यापीठाच्या कलावंतांनी विविध विभागांत आपली छाप पाडली. जगन्नाथराव नाडापुडे स्मरणार्थ नाट्य गटातील सर्वोत्कृष्ट संघाचा फिरता चषक आणि डॉ. दिलीप बडे ललित कला प्रकारातील सर्वोत्कृष्ट संघाचा फिरता चषक विद्यापीठाने पटकावला. याशिवाय ललित कला आणि नाट्य विभागातील उत्कृष्ट संघ म्हणूनही विद्यापीठाची निवड झाली.

ललित कला विभागात रांगोळी, चित्रकला, स्पॉट फोटोग्राफी आणि इन्स्टॉलेशनमध्ये प्रथम क्रमांक मिळाला. कोलाज व व्यंगचित्रकलेत द्वितीय, तर मृदुमूर्तिकलेत तृतीय क्रमांक मिळवला. नाट्य विभागात प्रहसनात प्रथम, तर मूकाभिनय आणि एकांकिकेत द्वितीय क्रमांक मिळाला. उत्कृष्ट अभिनेता म्हणून आकाश गुंजाळने प्रथम क्रमांक मिळवला. 'द सोर्स ऑफ लाईफ' या एकांकिकेतील 'विवान'च्या भूमिकेसाठी त्याची निवड झाली. उत्कृष्ट दिग्दर्शनात साधना विठोरे हिने द्वितीय क्रमांक मिळवला. संगीत विभागात नाट्यसंगीत, पाश्चात्त्य सुगम गायन आणि पाश्चात्त्य समूह गायनात द्वितीय, तर भारतीय शास्त्रीय गायनात तृतीय क्रमांक मिळवत विद्यापीठाच्या कलावंतांनी यशाची परंपरा कायम ठेवली.

प्रा. डॉ. पुरूषोत्तम अग्रवाल यांच्या हस्ते आज गांधी साहित्य संमेलनाचे उद्घाटन

एमजीएममध्ये दोन दिवस विचारमंथन; चार भाषांत गांधी विचारांवर चर्चा, 26 देशांतील अभ्यासकांचा सहभाग

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : महात्मा गांधी यांच्या विचारांचे अधिष्ठान असलेल्या महात्मा गांधी मिशन आणि पुणे येथील महाराष्ट्र गांधी स्मारक निधी यांच्या संयुक्त विद्यमाने दुसरे अखिल भारतीय गांधी साहित्य संमेलन आज (गुरुवारी) एमजीएम स्पोर्ट्स स्टेडियम येथे सुरू होत आहे. प्रसिद्ध लेखक, समीक्षक व विचारवंत प्रा. डॉ. पुरुषोत्तम अग्रवाल यांच्या हस्ते सकाळी ९.३० वाजता संमेलनाचे उद्घाटन होणार आहे.

डॉ. कुमार सप्तर्षी नगर येथे होणाऱ्या या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विवेक सावंत राहणार असून, स्वागताध्यक्षपद महात्मा गांधी मिशनचे सचिव तथा एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम भूषविणार आहेत. उद्घाटनप्रसंगी एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष शिवाजीराव कदम, डॉ. योगी गांधी, डॉ. पी. एम. जाधव, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलगुरू डॉ. शशांक दळवी, माजी कुलगुरू प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे, अन्वर राजन, लक्ष्मीकांत देशमुख, डॉ. आशिष गाडेकर यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे मराठी, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी या चार भाषांमध्ये गांधी विचार व तत्त्वज्ञानावर समांतर चर्चा, परिसंवाद आणि शोधनिबंधांचे सादरीकरण होणार आहे. भारतीय राष्ट्रवाद, आंतरराष्ट्रीय शांतता, लोकशाही, सामाजिक न्याय, सत्य, स्वातंत्र्य, मानवतावाद, अहिंसावादी सत्याग्रह, शाश्वत विकास आणि पर्यावरण अशा विविध विषयांवर विचारमंथन होणार आहे.

आज पहिल्या दिवशी दांडी मार्च प्रदर्शन, पत्रकार गांधी प्रदर्शन, लाईव्ह आर्ट व शिल्पकला उपक्रमांचे उद्घाटन होणार आहे. त्यानंतर विविध परिसंवाद होणार असून, सायंकाळी गांधी बँडचे संगीत सादरीकरण आणि मुशायरा-कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

शुक्रवारी आंतरधर्मीय प्रार्थनेनंतर जागतिक शांतता, आजच्या राजकीय प्रतिकार चळवळी, गांधीवाद तसेच महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर परिसंवाद होणार आहेत.

संमेलनात देशातील गांधी अभ्यासक, साहित्यिक, पत्रकार व विचारवंतांसह २६ देशांतील अभ्यासक सहभागी होणार आहेत. गांधी नाव असलेल्या विद्यापीठांच्या कुलगुरू व माजी कुलगुरूंची गोलमेज परिषदही होणार आहे. लघुपट व पटकथा लेखन, पोस्टर, पथनाट्य व निबंध स्पर्धा, गांधी स्टॅम्प, खादी व गांधी ग्रंथ प्रदर्शनासह जर्मनीच्या छायाचित्रकार अंजा बोनहॅप यांचे 'ग्लोबल फुटप्रिंट्स ऑफ महात्मा गांधी' हे छायाचित्र प्रदर्शन संमेलनाचे आकर्षण ठरणार आहे.

जिल्हा ग्रंथालय कार्यालयात 9 ऑक्टोबरपर्यंत ग्रंथप्रदर्शन

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी



परभणी-- दि.३ ते ९ ऑक्टोबर या कालावधीत अभिजात मराठी भाषा सप्ताह म्हणून साजरा करण्यात येत आहे. या अनुषंगाने परभणी येथील जिल्हा ग्रंथालय कार्यालयात ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालय, परभणीचे पर्यवेक्षक तथा ग्रामीण कथाकार राजेंद्र गहाळ यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून अभिजात मराठी भाषा' या विषयावर गहाळ यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. गहाळ यांनी स्पर्धा परीक्षा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना मराठी भाषेचा इतिहास, मराठी भाषेचे महत्त्व, मराठी भाषेची विविधता आणि आपली संस्कृती व मराठी भाषा या विषयावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी बहारदार कथाकथन केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष धों. साबळे यांनी केले. तसेच स्पर्धा परीक्षेच्या विदयार्थ्यांनी तसेच नागरिकांनी जास्तीत जास्त ग्रंथालयाचा तसेच ग्रंथप्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परभणी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील लिपीक सचिन गायकवाड यांनी, तर आभारप्रदर्शन कोंडीबा गाडेवाड यांनी केले. या कार्यक्रमासाठी स्पर्धा परीक्षेच्या अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातील कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

निवृत्ती वेतनधारकांसाठी 'महाउपलब्धी' ॲप ठरणार उपयुक्त

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी



परभणी: राज्य शासनाच्या निवृत्ती वेतनधारक व कुटुंब निवृत्ती वेतनधारकांसाठी 'Maha-UPLABDHI (महाउपलब्धी)' हे मोबाईल ॲप दि. 1 जुलै 2026 पासून उपलब्ध करून देण्यात आले आहे. या ॲपच्या वापराबाबत निवृत्ती वेतनधारकांना मार्गदर्शन करण्यासाठी नुकतेच परभणी कोषागाराच्या वतीने जिल्हा नियोजन सभागृहात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) डॉ. रिचा बागला तसेच लेखा व कोषागारेच्या संचालक दीपा देशपांडे यांनी ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन केले. या वेळी निवृत्ती वेतनधारक व कुटुंब निवृत्ती वेतनधारकांना 'महाउपलब्धी' ॲपच्या विविध सुविधांची माहिती देण्यात आली.

'महाउपलब्धी' ॲपच्या माध्यमातून निवृत्ती वेतनधारक व कुटुंब निवृत्ती वेतनधारकांना त्यांच्या निवृत्ती वेतनासंदर्भातील विविध तपशील मोबाईलवर पाहता येणार आहेत. तसेच हयातीचा दाखला, फॉर्म क्रमांक 16, उत्पन्नाचे प्रमाणपत्र आदी आवश्यक बाबी ऑनलाइन उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे निवृत्ती वेतनाशी संबंधित माहिती व आवश्यक कागदपत्रे सहजपणे उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

कार्यशाळेस जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. दत्ता गो. भांगे, अप्पर कोषागार अधिकारी महेश भा. कुलकर्णी तसेच अप्पर कोषागार अधिकारी (निवृत्ती वेतन) ना. मा. बोधणकर उपस्थित होते. उपस्थित अधिकारी व मान्यवरांनी निवृत्ती वेतनधारक व कुटुंब निवृत्ती वेतनधारकांना ॲपच्या वापराबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेस जिल्ह्यातील निवृत्ती वेतनधारक व कुटुंब निवृत्ती वेतनधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वहीदखान शबीर खान, कैलास आवरगंड, सुरेश गुंजकर, नरसिमलु पचनुरे, समाधान शेरे, शेख शोयब इस्माईल मोहम्मद, अनिकेत अरुणराव पाटील व तुषार मधुकरराव इंगोले यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनंत उत्तमराव नांदेडकर यांनी केले.

आसीम रहीम शेख याची गोळाफेकमध्ये तालुक्यात प्रथम क्रमांकाची कामगिरी



अजिंठा प्रतिनिधी सिल्लोड : दिनांक ६ ऑक्टोबर २०२६ रोजी सुदगिरणी मैदान, भराडी रोड, सिल्लोड येथे सिल्लोड तालुका स्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या.

या स्पर्धेत स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल, शिवना या शाळेचा विद्यार्थी आसीम रहीम शेख याने गोळाफेक क्रीडा प्रकारात ८.६० मीटर अंतरावर गोळा फेकून तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीमुळे आसीमची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. आसीमच्या या यशाबद्दल शाळेचे संचालक श्री. दिलीपराव काळे, मुख्याध्यापक श्री. पांडुरंग राऊत आणि क्रीडा शिक्षक श्री. सोफियान अहमद यांनी त्याचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेसाठी लवकरच ऑनलाइन अर्ज

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेसाठी लवकरच ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येणार असून त्यासाठी शासनाने कोणत्याही अशासकीय व्यक्ती अथवा संस्थाना प्राधिकृत केलेले नाही. यासंदर्भात समाज माध्यमांवर प्रसारित होत असलेल्या चुकीच्या जाहिरातीना बळी पडू नये. तसेच अर्जदारास अर्ज भरताना काही अडचण/शंका असल्यास नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखाने /कार्यालयांशी किंवा 1962 या टोल फ्रि नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेच्या नावाखाली काही कंपन्या कागदपत्रे जमा करत असल्याची बाब निर्दशनास आली आहे. यासंदर्भात पशुसंवर्धन विभागाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

पशुसंवर्धन विभागाने दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, राज्य मंत्रिमंडळाने शासन निर्णय दि. 9/3/2026 अन्वये राज्यात मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना मंजूर केली आहे. सदर योजनेद्वारे ग्रामीण भागात पशुपालनाद्वारे उद्योजकता निर्माण करणे हा प्रमुख हेतू आहे. या योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना दुधाळ गायी, म्हशी , शेळया, मेंढ्या, कुक्कुट पक्षी व वराह अनुदान तत्वावर देण्यात येणार आहेत. या योजनांची अमंलबजावणी पारदर्शकपणे होण्यासाठी व योजनेचा लाभ थेट लाभार्थ्यास व्हावा यासाठी योजनांची अमंलबजावणी ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहे. यासाठी ऑनलाईन प्रणाली विकसित करण्याचे काम अंतिम टप्यात असून लवकरच ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे. सदर प्रणाली विकसित करताना अर्जदाराच्या दृष्टीने सुलभता यावी, यासाठी अर्जदारांशी संबंधित बरीचशी कागदपत्रे (उदा. ७/१२/ उतारा , रेशनकार्ड, दिव्यांग प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र इ.) ऑनलाईन पध्दतीने परस्पर उपलब्ध करून घेण्यात येणार आहेत.

या योजनांसाठी शासनाच्या महा-डिबीटी पोर्टलवरुन केवळ आधारकार्ड क्रमांक किवा महाआयडी क्रमांक टाकून अर्जदारास अर्ज करता येईल. त्यामुळे कोणीही विविध समाज माध्यमांवर प्रसारित होत असलेल्या चुकीच्या जाहिरातीना बळी पडू नये. तसेच अर्ज भरताना काही अडचण/शंका असल्यास अर्जदारांनी नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखाने /कार्यालयांशी किंवा 1962 या टोल फ्रि नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

गुरांसाठीचा जिल्ह्यातला चारा-वैरण राहणार जिल्ह्यातच; जिल्ह्याबाहेर हिरवा, वाळलेला चारा, गवत वाहतुकीस बंदी

हिंदू प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी : जिल्ह्यात यंदाच्या पावसाळ्यात सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झाल्यामुळे चारा उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी होण्याची शक्यता आहे. परिणामी आगामी काळात चाराटंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी जिल्ह्यात उपलब्ध हिरवा व वाळलेला चारा, गवत व वैरण जिल्ह्यातच राहणार आहे. जिल्ह्यात उपलब्ध हिरवा व वाळलेला चारा, गवत आणि वैरणीची जिल्ह्याबाहेर विक्री व वाहतूक करण्यास बंदी घातली आहे.

सन २०२६ च्या खरीप हंगामात ट्रिगर-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या आणि दुष्काळ जाहीर झालेल्या सर्व तालुक्यांमध्ये विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत. परभणी जिल्ह्यातील सर्व 9 तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र वैरण (निर्यात नियंत्रक) आदेश, २००१ मधील तरतुदींनुसार हा आदेश जारी करण्यात आला आहे. जिल्ह्यातील पशुधनासाठी उपलब्ध चाऱ्याचे संरक्षण करून संभाव्य चारा टंचाईच्या काळात पशुपालकांना चारा उपलब्ध राहावा, हा या निर्णयाचा उद्देश आहे.

या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हा आदेश दि. 6 ऑक्टोबरपासून पुढील आदेशापर्यंत अंमलात राहणार असल्याचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

सातारा-देवळाईला आजपासून 50 वाढीव टँकर

अनिल माकरिये यांचे आश्वासन; दिवाळीअखेर कायमस्वरूपी पाणी प्रश्न सोडविणार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : सातारा-देवळाई परिसरातील तीव्र पाणीटंचाईचा प्रश्न तातडीने सोडविण्याच्या मागणीसाठी सातारा-देवळाई पाणी संघर्ष कृती समितीच्या वतीने मनपाच्या स्थायी समितीचे सभापती अनिल माकरिये यांना निवेदन देण्यात आले. परिसरातील अनियमित व अपुरा पाणीपुरवठा, वाढती लोकसंख्या आणि त्या तुलनेत अपुरी पाणीपुरवठा व्यवस्था यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले.

सातारा-देवळाई परिसरातील नागरिकांना नियमित व पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नसल्याने दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे टँकरद्वारे तात्पुरता पाणीपुरवठा करण्याबरोबरच कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी समितीने केली.

निवेदनाची दखल घेत अनिल माकरिये यांनी संबंधित मनपा अधिकाऱ्यांशी चर्चा करून तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. नागरिकांना तत्काळ दिलासा देण्यासाठी आजपासून सातारा-देवळाई परिसरात ५० वाढीव पाणी टँकर सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. टँकर हा केवळ तात्पुरता उपाय असून परिसरातील पाणीटंचाईचा कायमस्वरूपी प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील. दिवाळीअखेर सातारा-देवळाईचा पाणी प्रश्न सोडविण्याचे आश्वासन माकरिये यांनी दिले.

यामुळे नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला असला, तरी आश्वासनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि नियमित पाणीपुरवठा कधी सुरू होतो, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

यावेळी प्रभाग क्रमांक २६ मधील नगरसेवक पदमसिंग राजपूत, नगरसेविका सविता कुलकर्णी, पाणी संघर्ष कृती समितीचे पदाधिकारी राजीव थेटे पाटील, रवींद्र पिंगळीकर, महेंद्र चिद्रावार, आकाश बिराजदार, स्वप्नील शिरसाट, आबासाहेब देशमुख, स्मिताबाई अवचार, कल्पनाबाई राजपूत, भारतीताई भांडेकर यांच्यासह सातारा-देवळाई परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सेवानिवृत्त ACP अनिल गायकवाड यांच्या सुरांना वन्समोर

'मिक्स बॉलीवुड पार्ट-3'ला रसिकांचा प्रतिसाद; सादर केली आठ गाणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : सेवानिवृत्त ACP अनिल गायकवाड यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त संत एकनाथ रंगमंदिरात 'स्वरवीर प्रस्तुत मिक्स बॉलीवुड पार्ट-३' या संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. रसिकांसाठी हा कार्यक्रम मोफत ठेवण्यात आला होता. जुन्या हिंदी गीतांनी रंगलेल्या या कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अनिल गायकवाड यांनी स्वतः आठ गाणी सादर केली. 'मैं आया हूं साज' या गीताने त्यांनी गायनाला सुरुवात केली. त्यानंतर विविध गीते सादर करत त्यांनी रसिकांची दाद मिळवली. अखेरीस सादर केलेल्या 'ओम शांती ओम' या गीताला रसिकांनी विशेष प्रतिसाद देत वन्समोरचा आग्रह केला.

पुण्याहून आलेल्या भाग्यश्री डुंबरे यांनी १२ गाणी सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. 'सुन सायबा सुन प्यार की धुन' या गीताने त्यांनी सुरुवात केली. चंद्रकांत कांबळे यांच्यासोबत त्यांनी सादर केलेली 'सौ साल पहले मुझे तुमसे प्यार था' आणि 'दिन सारा गुजारा तेरे कंगना' ही युगलगीते विशेष गाजली. या गीतांनाही रसिकांनी वन्समोरचा आग्रह केला.

कार्यक्रमात गणेश देशपांडे, डॉ. अतुल पोरे, डॉ. कुशल जैन, विक्रांत खाडे, चंद्रकांत कांबळे, धम्मपाल हिवराळे, रेखा पोळ आणि अश्विनी जोशी-देशपांडे यांनीही विविध गीते सादर केली. कार्यक्रमाचे संयोजन सुनंदा गायकवाड आणि अ. आर. राज यांनी केले.

दुष्काळग्रस्त विद्यार्थिनींचे परीक्षा शुल्क माफ करण्याची मागणी

डॉ. साईनाथ बनसोडे यांचे एस.एन.डी.टी. विद्यापीठाच्या कुलसचिवांना निवेदन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



मुंबई : दुष्काळसदृश परिस्थितीमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या कुटुंबांतील विद्यार्थिनींना दिलासा देण्यासाठी त्यांचे चालू सत्रातील परीक्षा शुल्क १०० टक्के माफ करावे, अशी मागणी एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. साईनाथ बनसोडे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांना निवेदन दिले.

राज्यातील अनेक भागांत दुष्काळामुळे शेतकरी, कष्टकरी आणि ग्रामीण कुटुंबांवर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे विद्यार्थिनींच्या शिक्षणाचा खर्च भागविण्यासह परीक्षा शुल्क भरणेही पालकांसाठी अडचणीचे ठरत आहे. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थिनीला परीक्षा देता येऊ नये किंवा शिक्षण अर्धवट सोडावे लागू नये, यासाठी विद्यापीठाने निर्णय घेण्याची गरज असल्याचे बनसोडे यांनी म्हटले आहे. दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थिनींचे परीक्षा शुल्क पूर्णपणे माफ केल्यास त्यांना मोठा आर्थिक आधार मिळेल. तसेच त्यांचे शिक्षण सुरू ठेवण्यास मदत होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दुष्काळामुळे आधीच आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या कुटुंबांवर परीक्षा शुल्काचा अतिरिक्त भार पडू नये. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने या मागणीचा तातडीने विचार करून विद्यार्थिनींच्या हिताचा निर्णय घ्यावा, अशी मागणी डॉ. बनसोडे यांनी केली आहे.

घाटनांद्रा येथे बनावटी देशी-विदेशी दारूचा 1.76 लाखांचा साठा जप्त

राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई; तीन आरोपी अटकेत

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : सिल्लोड तालुक्यातील घाटनांद्रा येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने छापा टाकून बनावटी देशी व विदेशी मद्याचा साठा जप्त केला. या कारवाईत एकूण १ लाख ७५ हजार ९१० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार ६ ऑक्टोबर रोजी घाटनांद्रा येथे ही कारवाई करण्यात आली. यावेळी कागदी खोक्यांमध्ये ठेवलेल्या बनावटी देशी दारू 'भिंगरी संत्रा'च्या १८० मिली क्षमतेच्या १ हजार ८७२ सिलबंद बाटल्या, तसेच बनावटी विदेशी मद्य 'रॉयल स्टॅग'च्या १८० मिली क्षमतेच्या ९६ सिलबंद बाटल्या आढळून आल्या. याशिवाय आय.बी. ब्रँडची २०० लिटर क्षमतेची प्लास्टिक कॅन, जिवंत बुचे आणि विदेशी मद्य तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे सुमारे २० लिटर ब्लेंडही जप्त करण्यात आले.

बनावटी देशी व विदेशी मद्य विक्रीच्या उद्देशाने बाळगल्याप्रकरणी आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ मधील कलम ६५ (ब), ६५ (ई), ८१, ८३, ९० व १०८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क आयुक्त राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपआयुक्त तथा अधीक्षक अभिनव बालुरे आणि उपअधीक्षक गुणाजी क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक नागनाथ श्रीहरी नागरगोजे यांच्या पथकाने केली. दुय्यम निरीक्षक एल. बी. माटेकर, व्ही. एन. रानमाळकर, जवान के. जी. मोटे, टी. ए. जारवाल, एम. एस. मुजमुले, डी. एस. साळुंके, एस. पी. बागडे, वाहनचालक ए. एस. अन्नदाते व इतर कर्मचाऱ्यांनी कारवाईत सहभाग घेतला. पुढील तपास दुय्यम निरीक्षक व्ही. एन. रानमाळकर करीत आहेत.

परभणीत पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी 24x7 मतदार मदत कक्ष कार्यान्वित

मतदारांसाठी निशुल्क क्रमांक 1077; 02452-226400 उपलब्ध

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या 5-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक-2026 च्या अनुषंगाने मतदारांना आवश्यक माहिती व मदत उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे 24x7 तत्वावर मतदार मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. हा मदत कक्ष निवडणूक प्रक्रिया (31 ऑक्टोबर 2026) पूर्ण होईपर्यंत कार्यरत राहणार मतदार मदत कक्षप्रमुख तथा जिल्हा नियोजन अधिकारी उमेश वाघमारे यांनी कळविले आहे.

या निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. 23 ऑक्टोबर 2026 रोजी मतदान, तर मंगळवार, दि. 27 ऑक्टोबर 2026 रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक प्रक्रियेसंदर्भात मतदारांना आवश्यक माहिती, मार्गदर्शन तसेच प्राप्त होणाऱ्या तक्रारी व संदेशांची नोंद घेऊन त्यावर तातडीने कार्यवाही करण्याच्या दृष्टीने मदत कक्ष कार्यरत राहणार आहे. मतदारांना मदत कक्षाशी संपर्क साधण्यासाठी टोल फ्री क्रमांक 1077 तसेच दूरध्वनी क्रमांक 02452-226400 उपलब्ध करून देण्यात आला आहे.

दि. 2 ते 31 ऑक्टोबर 2026 या कालावधीत मदत कक्षाच्या कामकाजासाठी एकूण 105 अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा नियोजन समिती, परभणी येथील दोन सांख्यिकी सहायक व एका महसूल सहायकाची कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 10 ते रात्री 9.45 वाजेपर्यंत नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच 102 ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची निर्धारित वेळापत्रकानुसार सकाळी 10 ते रात्री 8 वाजेपर्यंत मदत कक्षात उपस्थिती राहणार आहे.

मदत कक्षात दूरध्वनीवरून प्राप्त होणारे सर्व संदेश व विचारणा तात्काळ नोंदवहीत नोंदविण्यात येणार असून, कक्षास भेट देणाऱ्या नागरिकांचीही नोंद ठेवण्यात येणार आहे. प्राप्त संदेशांची माहिती वेळोवेळी कक्षप्रमुख तथा जिल्हा नियोजन अधिकारी उमेश वाघमारे यांना उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सोपविण्यात आलेली जबाबदारी दक्षतेने पार पाडावी, असे निर्देश देण्यात आले असून, निवडणूक काळात कामकाजात कुचराई, निष्काळजीपणा अथवा आदेशाचे उल्लंघन झाल्यास लोकप्रतिनिधित्व अधिनियम, 1951 मधील कलम 134 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979 मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी आदेशात नमूद केले आहे.

पडेगावात रॉयल ऑटो वर्क्सच्या नवीन शाखेचे उद्घाटन

महापौर समीर राजूरकर यांच्या हस्ते उद्घाटन; विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : गेल्या ३७ वर्षांपासून शहरातील दुचाकी वाहनचालकांच्या विश्वासास पात्र ठरलेल्या रॉयल ऑटो वर्क्सने व्यवसायाचा विस्तार करत पडेगाव येथे नवीन शाखा सुरू केली आहे. या शाखेचे उद्घाटन महापौर समीर राजूरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला माजी उपमहापौर संजय जोशी, माजी पोलीस अधिकारी अशोक आमले, संतोष आमले, नगरसेवक काकासाहेब काकडे, रशीद मामू शेख, हिरालाल वाणी, पैलवान प्रेम कांबळे, एमआयएमचे शहर उपाध्यक्ष सय्यद हारून, ज्येष्ठ नागरिक सय्यद हबीब, मिलिंद दाभाडे, काँग्रेसचे सय्यद जाकेर यांच्यासह राजकीय, सामाजिक, क्रीडा, बँकिंग, वैद्यकीय तसेच वाहन व दुचाकी क्षेत्रातील विविध संघटनांचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. रॉयल ऑटो वर्क्सने गेल्या ३७ वर्षांत दुचाकी वाहनांच्या दुरुस्ती व सेवाक्षेत्रात ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. पडेगाव येथील नवीन शाखेमुळे परिसरातील दुचाकीधारकांना सेवा अधिक सुलभपणे उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी औरंगाबाद टू व्हीलर मेकॅनिक असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष सय्यद चांद, अस्लम सय्यद आणि सय्यद अन्सार यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

दुष्काळात पशुधनासाठी चाऱ्याची चिंता; कृषी-पशुसंवर्धन विभागाला संयुक्त कृतीचे आदेश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

दुष्काळी परिस्थितीत पशुधनाला चारा आणि पाण्याची कमतरता भासू नये, यासाठी प्रशासनाने आतापासूनच नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिले. चारा उत्पादन, साठवणूक तसेच मुरघास प्रकल्पांना चालना देण्यासाठी कृषी आणि पशुसंवर्धन विभागाने समन्वयाने उपाययोजना राबवाव्यात, असे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक सोसायटीच्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी पशुधनाच्या सुरक्षिततेसह चारा व्यवस्थेचा आढावा घेतला. दुष्काळाच्या काळात जनावरांची मोठ्या प्रमाणावर वाहतूक होण्याची शक्यता असल्याने वाहतुकीदरम्यान जनावरांचे टॅगिंग झाले आहे की नाही, याची परिवहन विभागाने काटेकोर तपासणी करावी. तसेच जनावरांची वाहतूक करताना त्यांच्यावर कोणत्याही प्रकारे निर्दयता होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

दरम्यान, जिल्ह्यातील पशुधनासाठी आवश्यक प्रमाणात चारा उपलब्ध राहावा, यासाठी चारा उत्पादन वाढविणे, उपलब्ध चाऱ्याची योग्य पद्धतीने साठवणूक करणे आणि मुरघास प्रकल्पांचा प्रभावी वापर वाढविण्यावर बैठकीत भर देण्यात आला. आगामी काळातील गरज लक्षात घेऊन चारा उपलब्धतेची खातरजमा करण्यासाठी दोन्ही विभागांनी संयुक्त कृती आराखडा तयार करून काम करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

बैठकीस उपमुख्य कार्यकारी अधिकारी राघवेंद्र घोरपडे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. नानासाहेब कदम, सहायक आयुक्त डॉ. रमण इंगळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या गलथान कारभारामुळे खुलताबादकर एस टी बसच्या सुविधेपासून वंचित

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

खुलताबाद प्रतिनिधी संतोष करपे. महाराष्ट्र सरकारने प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू केलेले महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या एस टी बस च्या सेवेपासून. खुलताबाद तालुक्यातील नागरिक व तीर्थस्थळ घृष्णेश्वर मंदिर जगद्गुरु जनार्दन स्वामी मंदिर. जगप्रसिद्ध वेरूळ लेणी. म्हैसमाळ येथील .बालाजी मंदिर. गिरजा देवी मंदिर. खुलताबाद. येथील जागृत देवस्थान भद्रा मारुती श्री सुलिभांजन देवस्था नवरात्र महोत्सव. काळात व सणासुदीच्या काळामध्ये एस टी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराने या ठिकाणी येणाऱ्या भाविकांची मोठी गैरसोय होणार आहे . ठिकाणाहून अनेक विद्यार्थी सवलतीचे पास काढून छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी शिक्षणासाठी जातात . तसेच ज्येष्ठ नागरिक. महिला येणारे ची हि संख्याही मोठ्या प्रमाणात असताना छत्रपती संभाजी नगर ते खुलताबाद दरम्यान प्रवासात कुठलीही अडचण नसताना मनमानी पद्धतीने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ छत्रपती संभाजीनगर एस टी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या गलथान कारभारा मुळे एस टी महामंडळाचे मोठे नुकसान यामुळे होत असल्याचे दिसून येते



(खुलताबाद शहरात एस टी महामंडळाच्या मालकीच्या जागेवर नवीन बस स्थानक बिल्डिंग आमदार प्रशांत बंब यांनी तालुक्यातील जनतेच्या पर्यटकांसाठी जगभरातून येणाऱ्या भाविक भक्तांसाठी सुख सुविधा युक्त महत्त्वाची बाब म्हणून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांच्याकडून . ९ कोटी ९१ लाख रुपयाचे भव्य दिव्य सर्व सुविधा युक्त बिल्डिंग. मोठे काम हाती घेतले असून त्याचा शुभारंभ वॉल कंपाऊंड कंपाऊंडच्या कामापासून झाला असून जवळपास वॉल कंपाऊंड चे काम पूर्ण होत आले आहे प्रवाशांना सुख सुविधा देण्याचे काम या ठिकाणी शासन करीत असतानाही एस टी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या बेजोबदारपणा आडमुठ्या धोरणामुळे दि ६ ऑक्टोंबर पासून खुलताबाद बस स्थानकातील वाहतूक नियंत्रण कक्ष बंद केल्याचे दिसून येत आहे)

या मुळे या ठिकाणी अतिक्रमण घाण व कचराकुंडीचे स्वरूप. खाजगी वाहने . बंद पडलेली वाहने उभे करण्यासाठी बस स्थानका च्या असलेल्या जागेचा दुरुपयोग होऊ शकतो या सर्व बाबीचा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विचार करून करून या ठिकाणचे वाहतूक नियंत्रण कक्ष तात्काळ सुरू करणे अत्यंत गरजेचे आहे

याबाबत तात्काळ दखल घ्या बस सेवा सुरळीत चालू करा या बाबत गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब यांनी दि ३० सप्टेंबर रोजी पत्र देऊन व

खुलताबाद नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष नवनाथ बारगळ यानी नागरिकांच्या होणाऱ्या गैरसोई बाबत एस टी महामंडळाच्या वरिष्ठां अधिकाऱ्यांना निवेदन देऊन तात्काळ बस सेवा खुलताबाद वाहतूक नियंत्रण कक्ष सुरू ठेवण्याबाबत मागणी केली आहे

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911